# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.11.2024** **वारःरविवार**

---

1. महाराष्ट्रात निवडणूक प्रचाराला वेग, मराठवाड्याच्या विकासासाठी महायुतीचे अथक प्रयत्न सुरू असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. झारखंडमध्ये झंझावाती प्रचार, पदफेऱ्याचा धडाका, पंतप्रधान मोदी, अमित शहा, राहुल गांधीच्या प्रचार यात्रा
3. खरीप हंगामात केंद्रसराकडून 120 लाख मेट्रीक टन भाताची खरेदी, पंजाबच्या साडेसहा लाखांहून शेतकऱ्यांना फायदा
4. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रॅंकिंग्ज आशिया 2025 मध्ये सात भारतीय संस्थांना सर्वोच्च शंभरमध्ये स्थान आणि
5. बिलियर्डसपटू पंकज अडवाणीची जागतिक बिलियर्डस अजिंक्यपदाला गवसणी

**पंतप्रधान -महाराष्ट्र प्रचार**

महायुती सरकारनं महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या विकासासाठी अथक प्रयत्न केले आहेत, असं पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रात नांदेड इथं प्रचार सभेत सांगितलं. गेल्या अडीच वर्षांत मराठवाड्यात 80 हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झाली आहे असं सांगून त्यांनी या भागातील 11 सिंचन प्रकल्पांवर प्रकाश टाकला. दिल्ली-मुंबई औद्योगिक पट्टा, रेल्वे डबा कारखाना, लॉजिस्टिक पार्क, समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ द्रुतगती मार्ग आणि नांदेड ते दिल्ली आणि आदमपूर या नवीन विमानसेवांसारख्या महत्त्वाच्या कामांची माहिती दिली आणि स्थानिक रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करण्याचा विश्वास व्यक्त केला.

काँग्रेस ओबीसींवरुन राजकारण करत असल्याचा आरोप करताना, काँग्रेस ओबीसीची ओळख संपवण्याचा आणि त्यांना वेगवेगळ्या जातींमध्ये विभागण्याचा प्रयत्न करत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. तत्पूर्वी, पंतप्रधान मोदींनी अकोला इथं निवडणूक सभेला संबोधित करताना विदर्भातील सिंचन प्रकल्पांचे महत्त्व अधोरेखित केलं. केंद्र सरकारने अमरावती इथं टेक्सटाईल पार्कची पायाभरणी करून कापूस उत्पादकांसाठी उद्योग आणि पायाभूत सुविधांना चालना दिली असल्याचे ते म्हणाले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल वर्ध्यात प्रचार केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणीत शिवसेनेच्या उमेदवारांच्या निवडणूक सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना रखडणार नाही, असा पुनरुच्चार केला. महायुतीचं सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊ, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपुरात दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुणे आणि सांगली जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघात सभांना संबोधित केलं. दुसरीकडे, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अमरावतीमधील तिवसा इथं एका सभेला संबोधित करताना भाजपवर फुटीरतावादाचे राजकारण करत असल्याची टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी हिंगोली, बीड आणि आष्टी इथं निवडणूक सभांना संबोधित केले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी हिंगोली आणि लोहा इथं सभांना संबोधित केलं.

**झारखंड-प्रचार**

झारखंडमध्ये निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. NDA आणि I.N.D.I.A या दोन्ही आघाड्यांचे नेते आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या बाजूने मतदारांना आकर्षित करण्यासाठी राज्यभर झंझावाती दौरे करत आहेत. पलामूमधील छतरपूर इथं

निवडणूक सभेला संबोधित करताना भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी हे ओबीसीविरोधी, दलितविरोधी आणि आदिवासीविरोधी असल्याचा आरोप केला. शाह यांनी जमशेदपूर इथं पदफेरीदेखील काढली. दुसरीकडे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी भाजपच्या कर धोरणांवर टीका केली आणि पक्षनेतृत्व गरिबांऐवजी भांडवलदारांची बाजू घेत असल्याचा आरोप केला. धनबादमधील बागमारा इथं निवडणूक सभेला संबोधित करताना गांधी म्हणाले की, केवळ संविधानच गरीब आणि दलितांच्या हिताचं रक्षण करू शकतं.

दरम्यान, पलामूमधील विश्रामपूर इथल्या सभेला संबोधित करताना भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यावर खोटी आश्वासने देऊन राज्यातील जनतेची फसवणूक केल्याचा आरोप केला. भाजपवर टीका करताना जे एम एम चे ज्येष्ठ नेते आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी त्यांच्या सरकारनं झारखंडच्या सर्वांगीण विकासासाठी खूप काही केलं असल्याचा दावा केला. RJD, AJSU आणि डाव्या पक्षांच्या नेत्यांनीही राज्याच्या विविध भागांमध्ये निवडणूक सभांना संबोधित केलं. 81 सदस्यीय विधानसभेसाठी या महिन्याच्या 13 आणि 20 तारखेला दोन टप्प्यात निवडणुका होणार आहेत, तर 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

<u>भात खरेदी</u>

केंद्र सरकारनं, 2024-25 च्या खरीप हंगामात शुक्रवारपर्यंतच्या आकडेवारीनुसार, 120 लाख मेट्रीक टन भाताची खरेदी केली आहे. त्यामुळे पंजाबच्या साडेसहा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचा 27 हजार 995 कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, अ श्रेणीच्या धानासाठी निर्धारीत 2320 रुपये प्रति क्विंटल दरानं किमान आधारभूत किंमतीनं खरेदी केली जात आहे. तसंच 4839 कारखान्यांनी भात प्रक्रियेसाठी अर्ज केले होते, त्यापैकी 4743 कारखान्यांना पंजाब राज्याकडून काम देण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं येत्या महिनाअखेरीपर्यंत यंदाच्या खरीप विपणन हंगामात 185 लाख मेट्रीक टन भारतखरेदीचं उद्दीष्ट्य निश्चित केलं आहे.

<u>सीतारामन</u>

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांसाठी, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना येत्या आर्थिक वर्षात पावणे सहा लाख कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्याचं उद्दीष्ट देण्यात आल्याची माहिती केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. बंगळुरू इथं सिडबी आयोजित राष्ट्रीय एमएसएमई क्लस्टर आऊटरीच कार्यक्रमात सीतारामन बोलत होत्या. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांकडून सूक्ष्म आणि लघु उद्योगांना केला जाणारा कर्जपुरवठ्यात 9 पूर्णांक 2 टक्क्यांनी वाढ झाली आहे तर खासगी बँकांकडून 25 टक्के आणि बिगर बँकिंग संस्थाकडून त्यात 39 टक्क्यांनी वाढ झाल्याचं अर्थमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

<u>विद्यापीठ-गुणांकन</u>

भारतातल्या सात संस्थांनी क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रॅंकिंग्ज आशिया 2025 मध्ये सर्वोच्च शंभरात स्थान मिळवलं आहे. दिल्लीतल्या भारतीय तंत्रज्ञान संस्था म्हणजेच आयआयटीसह भारतातली दोन विद्यापीठे पहिल्या पन्नासमध्ये तर सात विद्यापीठे सर्वोच्च शंभरात आली आहेत. संपूर्ण खंडामध्ये उच्चशिक्षणात भारताच्या उत्तरोत्तर वाढत्या प्रभावावर यामुळे शिक्कामोर्तब झालं असल्याचं शिक्षण मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यामध्ये भारताची मजबूत शैक्षणिक स्थिती दर्शवणाऱ्या मुंबई आयआयटी 48 क्रमांकावर असून, मद्रास, खरगपूर, कानपूर इथल्या आयआयटी, भारतीय विज्ञान संस्था तसंच दिल्ली विद्यापीठ या संस्थांनी सर्वोच्च शंभर मध्ये स्थान मिळवलं आहे.

<u>कर्तारपूर</u>

भारत आणि पाकिस्तानच्या दरम्यानच्या कर्तारपूर साहिब कॉरिडॉरला काल पाच वर्ष पूर्ण झाली. पाकिस्तानच्या नारोवाल जिल्ह्यातल्या श्री कर्तारपूर साहिब गुरूद्वाराकडे जातो. शीखांचे पहिले गुरु नानक देव यांनी त्यांच्या आयुष्यातली 18 वर्ष इथं व्यतीत केली होती. कॉरिडॉरचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 9 नोव्हेंबर 2019 रोजी झालं होतं. गेल्या पाच वर्षात लाखो भाविकांनी या ऐतिहासिक गुरुद्वाराला भेट दिली आहे.

**पुष्करमेळा**

राजस्थानात जगप्रसिद्ध पुष्कर यात्रेला अजमेरजवळ ध्वजारोहणानं काल सुरुवात झाली. ही यात्रा 15 नोव्हेंबरपर्यंत सुरू राहाणार असून, देश परदेशातून पर्यटकांनी इथं गर्दी झाली आहे. देशातल्या एकमेव ब्रह्मा मंदीरासह पुष्कर शहर रोषणाईनं उजळून निघालं आहे. पुष्कर सरोवराच्या 52 घाटांवर या निमित्तानं दीपदान करण्यात आलं तसंच काल सायंकाळी सात घाटांवर महाआरती करण्यात आली. देशी विदेशी पर्यटकांसाठी विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. सात दिवस सुरू राहाणाऱ्या यात्रेत अनेक प्रसिद्ध कलाकार त्यांची कला सादर करणार आहेत. पुष्कर यात्रेच्या पार्श्वभुमीवर शहर आणि परिसरात चोख सुरक्षा व्यवस्थाही ठेवली आहे.

**संगीतकार**

प्रख्यात भारतीय संगीतकार रिकी केज आणि अनुष्का शंकर यांनी 67 व्या ग्रॅमी पुरस्कारांसाठी ग्रॅमी नामांकनं मिळवली आहेत. तीन वेळा ग्रॅमी विजेत्या रिकी केजला त्याचा अल्बम ब्रेक ऑफ डॉनसाठी सर्वोत्कृष्ट न्यू एज, ॲम्बियंट किंवा चँट अल्बम श्रेणीतील चौथे ग्रॅमी नामांकन मिळाले. प्रसिद्ध सतारवादक आणि संगीतकार अनुष्का शंकर हिलाही याच श्रेणीत नामांकन मिळाले आहे.

**पॅराग्लायडींग**

हिमाचल प्रदेशात, कांगडा जिल्ह्यातील बीर-बिलिंग इथं जागतिक पॅराग्लायडिंग स्पर्धेचा काल समारोप झाला. आठ दिवस चाललेल्या या स्पर्धेत अमेरिकेच्या ऑस्टिन कॉक्सने एकंदर श्रेणीत प्रथम क्रमांक पटकावला, भारताच्या रणजित सिंग यानं दुसरा, तर पोलंडचा डॉमिनिक कपिका यानं तिसरा क्रमांक पटकावला. समारोप समारंभात राज्याचे तंत्रशिक्षण मंत्री राजेश धर्मानी यांनी सहभागी स्पर्धकांचा गौरव केला. बीर-बिलिंग इथं पॅराग्लायडिंग विश्वचषक स्पर्धा आयोजित करणं हिमाचल प्रदेशसाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचं धर्मानी यांनी नमूद केलं. राज्याच्या समृद्ध नैसर्गिक सौंदर्याचा ठळकपणे उल्लेख करुन त्यांनी पर्यटनाच्या पायाभूत सुविधा भक्कम करण्यावर सरकारचा भर असल्याचं सांगितलं.

**क्रिकेट**

क्रिकेटमध्ये आज संध्याकाळी दक्षिण आफ्रिकेतील गकेबरहा इथल्या सेंट जॉर्ज पार्क क्रिकेट मैदानावर 4 सामन्यांच्या T20 मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल. भारताला आपला जोम कायम राखण्याची आशा आहे. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सुरू होणार आहे. मालिकेतील तिसरा सामना बुधवारी सेंच्युरियनमध्ये तर चौथा सामना शुक्रवारी जोहान्सबर्ग इथं होणार आहे. सूर्यकुमार यादव भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे, तर एडन मर्कराम यजमान दक्षिण आफ्रिकेचं नेतृत्व करत आहे.

**पंकज**

भारताच्या पंकज अडवाणीनं IBSF विश्व बिलियर्ड्स अजिंक्यपद स्पर्धेत 150-अप फॉरमॅटचं विजेतेपद पटकावलं आहे. कतारमधील दोहा इथं झालेल्या स्पर्धेच्या अंतिम लढतीत त्यानं इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा पराभव केला. आयबीएफएसच्या जागतिक बिलियर्डस् स्पर्धेतलं पंकज अडवाणी याचं हे 18 वं विजेतेपद आहे. या स्पर्धेत भारताच्या सौरव कोठारी यानं कास्यपदक मिळवलं.

# याबरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.